**<u>गोपनीय</u>**

क्रमांक : का.स./बैठक/२२७

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),**
**<u>मुंबई - ४०० ०५१.</u>**

दिनांक : १५ जून, २००९.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ मे, २००९ रोजी झालेल्या २२७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१५-६-२००९

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br><u>मुंबई - ४०० ०३२.</u> | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर,<br>"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,<br><u>मुंबई - ४०० ०१८.</u> | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, <u>मुंबई - ४०० ०२५</u> | - | सदस्य |
| डॉ.शिरीष संख्ये<br>संचालक,<br>मॅकॅन्सी अँड कंपनी, एक्सप्रेस टॉवर,<br>२१ वा मजला, नरिमन पॉईंट,<br><u>मुंबई - ४०० ०२१</u> | - | सदस्य |
| प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br><u>मुंबई - ४०० ०३२.</u> | - | सदस्य |

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

**निमंत्रित :**

सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २२७ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २८ मे, २००९ (गुरुवार) |
| वेळ | : | संध्याकाळी ५.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी | - | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ.ज.मो.फाटक<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.जी.एस.गील<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

..२/-

**<u>निमंत्रित</u> :**

श्री.मनु कुमार श्रीवास्तव
सचिव, नगर विकास विभाग,
व सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग (अतिरिक्त कार्यभार)
महाराष्ट्र शासन

श्री.मिलिंद म्हैसकर
अतिरिक्त महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
सह महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

डॉ.सतीश बागल
वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

कु.उमा अड्सुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

श्री.अ.रा.वानखडे
उप महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.बा.नागे
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या २२६ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या २२६ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करताना असे सादर करण्यात आले की, श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी त्यांच्या दिनांक २४ मार्च, २००९ च्या पत्रान्वये सुचविलेल्या दुरुस्त्या खालीलप्रमाणे करण्यात आल्या :-

(१) पृष्ठ क्रमांक ४ वरील परिच्छेद क्र.२.२, पृष्ठ क्रमांक २९ वरील परिच्छेद क्र.१८.४ आणि पृष्ठ क्रमांक ३० वरील परिच्छेद क्र.१८.५ मध्ये श्री.जी.के.देशपांडे, सेवानिवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेऐवजी श्री.पी.एम.देशपांडे, सेवानिवृत्त मुख्य अभियंता, सिडको यांचे नाव समाविष्ट करण्यात आले.

(२) पृष्ठ क्र.२८ वरील परिच्छेद क्र.१८.३ मध्ये "कंत्राटदाराचा" व "जादा खर्च" या दोन शब्दांमध्ये पुढील वाक्य अंतर्भूत करण्यात आले – कंत्राटदाराचा **"वरकड खर्च (overhead) व थेट आस्थापनेवरील विनावापर (idle)"** जादा खर्च

(३) श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी खाली नमूद केलेले मुद्देही बैठकीत मांडले. ते मुद्दे कार्यवृत्तामध्ये समाविष्ट केलेले नसल्याने पृष्ठ क्र.२९ वरील परिच्छेद क्र.१८.३ पूर्ण झाल्यानंतर खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात आले.

(अ) कंत्राटातील तरतूदी (सेवावाहिन्या हटविण्यास झालेला विलंब किंवा त्या हटविणे शक्य नसल्यास कंत्राटदारास करावा लागणारा रचनेतील फेरबदल याबाबत "ना दाव्याची" कलमे) कार्यकारी समितीच्या बाब टिप्पणीत निदर्शनास आणावयास हवी होती.

(ब) विलंबाबाबत सूचीबध्द केलेल्या ६ कारणांचे परिमाण घेऊन जबाबदारीची निश्चिती करण्यात यावी. "(कंत्राटदार, प्रकल्प सल्लागार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण)."

वरील दुरुस्त्यांना कार्यकारी समितीने मान्यता दिली.

१.२ त्यानंतर, बैठकीचे कार्यवृत्त कायम करण्यात आले.

<u>बाब क्र.२</u> : **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या २२६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :-

<u>बाब क्र.३</u> : **<u>वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी", "जी-टेक्स्ट" व "जीएन" ब्लॉक येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचे कामासाठी प्रशासकीय मान्यता व निविदेस मंजूरी मिळणेबाबत.</u>**

श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी उपरोक्त कामांबदद्ल काही मुद्दे उपस्थित केले होते. सदरहू कामांच्या निविदा कार्यकारी समितीच्या दिनांक २६.०२.२००९ रोजी झालेल्या २२६ व्या बैठकीत बाब क्र.३ स्विकृतीसाठी सादर करण्यात आलेल्या होत्या. त्या मुदयांची पूर्तता खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

<u>मुद्दा क्र. अ)</u> कंत्राटदाराने दिलेल्या कारणांपैकी मूळ कारण हे मुलतः खोदकाम व विविध सेवा वाहिन्यांसाठी भुयारी / जमिनीखालील मार्गिकांची कामे या संबंधीत आहे

त्यानुसार -

१) सेवा वाहिन्यांच्या पसरलेल्या जाळयांमुळे खोदकाम यंत्राऐवजी मनुष्यबळाचा वापर करुन करावे लागणार आहे.

२) खोदकामासाठी व सेवा मार्गिकांच्या संरक्षणासाठी अतिरिक्त मनुष्यबळ व व्यवस्थापन करावे लागणार आहे.

३) खोदकामाची होणारी माती दूर अंतरावर टाकावी लागणार आहे.

त्यानुसार अंदाजपत्रक तयार करतेवेळी सर्व बाबींचा विचार करुन यांत्रिक पध्दतीने खोदकाम करणे गृहीत धरले आहे. त्यामुळे जादा लागणारे मनुष्यबळ व व्यवस्थापन यासाठीचा खर्च अंदाजपत्रक तयार करतेवेळी गृहीत धरता आला नाही.

<u>मुद्या क्र. ब)</u> मे.ओरियंटल कन्सलटींग इंजिनियर्स, बेलापूर, नवी मुंबई यांचा अशाप्रकारच्या कामांचा पूर्व अनुभव लक्षात घेता, त्यांची रस्त्यांच्या संकल्पचित्राच्या पुनर्विलोकनासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्याप्रमाणे नव्याने मे.ओरियंटल कन्सलटींग इजिनिअर्स, बेलापूर, नवी मुंबई यांनी 'जी', 'जी-एन' व 'जी-टेक्स्ट' ब्लॉकमध्ये वेगवेगळया रस्त्यांसाठी भूतांत्रिक अन्वेषण केले. भूतांत्रिक अन्वेषणाच्या अहवालानुसार, कॉंक्रीट रस्त्याचे संकल्पचित्र तयार करण्यात आले. सदरचे संकल्पचित्र हे आयआरसी-५८,२००२ प्रमाणे असून त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे काढण्यात आले.

i) Modulus of Sub Grade Reaction : 1.47 -3.52 kg./cm$^2$/cm
ii) Unsoaked CBR : 2.00 to 4.02%
iii) Soaked CBR (4 days) : 2.13 to 4.45%

| Recommended Road Crust | Remarks |
|---|---|
| PQC (with M-40 Grade) - 300 mm | With Polypropylene @ 125 gram/bag of cement |
| DLC - 150 mm | With roller compaction |
| WMM - 200 mm | With roller compaction |
| GSB -1 - 300 mm | With roller compaction (in two layers) |
| GSB - 2 - 150 mm | With roller compaction |

वर उल्लेख केल्याप्रमाणे संकल्पचित्राचे भारतीय प्रौद्योगीकी संस्थान, मुंबई (आय.आय.टी)

यांचेकडून पडताळणी करुन घेण्यात आले असून त्यांनी त्याप्रमाणे कामाची अंमलबजावणी करण्यास शिफारसही केलेली आहे.

तसेच वरील कामांची अंमलबजावणी करतेवेळी आय.सी.एम.क्यु (इंडिया) प्रा.लि., मुंबई व डॉ.इ.एस.भंगाळे मे.ओरीएंटल कन्सल्टींग इंजिनियर्स, नवी मुंबई हे कामांचे गुणवत्ता पर्यवेक्षण करतील.

**बाब क्र.१७ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत महाकाली केव्हज रस्त्याचे बांधकाम व रुंदीकरण - वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निर्देशानुसार महाकाली केव्हज येथील पूलांच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

२.२ त्यानंतर, कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ना.सी.फडके मार्गावरील साईवाडी जंक्शन येथे पूल बांधणेच्या कामाची निविदा मंजूर करण्याबाबत.**

३.१ महानगर आयुक्त यांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, ऑक्टोबर, २००८ मध्ये प्राधिकरणाच्या ठरलेल्या सुधारीत धोरणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक स्वरुपाची कामे एमएमआरडीएमार्फत करण्यात येऊ नयेत. सदर रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेला असल्यामुळे सदर पूलाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत होणे आवश्यक आहे. त्यावर डॉ.जयराज फाटक, महापालिका आयुक्त यांनी विनंती केली की, सदर पूलाच्या निविदा प्राधिकरणामार्फत मागविण्यात आल्या आहेत व निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून हे काम प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात यावे. मुख्य सचिव व श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनीही सदर काम प्राधिकरणामार्फत करण्याच्या सूचना केल्या. त्या सूचनांवर महानगर आयुक्त यांनी सहमती दर्शविली.

..७/-

**३.२** श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सूचित केले की, दुस-यांदा निविदा मागविताना त्या पहिल्यापेक्षा थोडया जास्त आलेल्या असल्यामुळे कंत्राटदाराशी वाटाघाटी करुन त्या पहिल्यांदा मागविलेल्या निविदेपेक्षा थोडया प्रमाणात कमी दराने करुन घ्याव्यात. त्यावर श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी सांगितले की, दुस-या निविदेमध्ये स्टीलच्या किंमती कमी झाल्यामुळे प्रत्यक्ष प्राधिकरणाला पहिल्या बोलीपेक्षा कमी दराने काम करुन मिळणार आहे.

**३.३** प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ना.सी.फडके मार्गावरील साईवाडी जंक्शन येथील पूलाचे कामाकरीता दुस-या बोलीतील मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५०.४०% अधिक दराचा सुधारीत देकार हा निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करणारा सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**३.४** त्यानंतर, कार्यकारी समितीच्या सदस्यांनी यावर पूर्णतः विचार केल्यावर प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर करण्यात आला :—

<u>ठराव क्र.११२३</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे ना.सी.फडके मार्गावरील साईवाडी जंक्शन येथील पूलाच्या बांधकामासाठीचा मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५०.४०% अधिक दराचा सुधारीत देकार रक्कम रु.१४,१३,७६,०००/- किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.४</u> : <u>दिनांक ३०.६.२००८ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे</u>.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २००८ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.५</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मे.रिहॅब हाऊसिंग प्रा.लि. व लार्सन ॲंड टुब्रो लि. (भागीदार संस्था) यांच्यामार्फत मौजे मानखुर्द येथील भूखंड क्र.२ब/४अ येथे प्रकल्पग्रस्तांकरीता कायमस्वरुपी घरबांधणी कंत्राटातील अंतिम देयकामधून वजा केलेली रक्कम परत करणेबाबत.</u>**

५.१ महानगर आयुक्त यांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, कामाचा कालावधी निविदेत दिल्याप्रमाणे १८ महिने इतका होता. त्याप्रमाणे सदर काम दिनांक १७ एप्रिल, २००४ रोजी पूर्ण होणे आवश्यक होते परंतु ते काम दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी पूर्ण झाले.

५.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती दिली की, जागतिक बँकेने व्यवस्थापन सल्लागारांच्या कंत्राटदारास तसेच सदनिका बांधकामाच्या कंत्राटास मुदतवाढ देताना मुदतवाढीची कारणे मान्य करुन दोन्ही कंत्राटदारांना दिनांक ३१ मार्च, २००५ पर्यंत विनाअट मुदतवाढ मान्य केली. या मान्यतेच्यावेळी व्यवस्थापन सल्लागाराची फी एकूण रक्कम रु.१८७.२१ लाख एवढी जागतिक बँकेने मंजूर केली. सबब, कार्यकारी समितीस विनंती करण्यात येते की, कंत्राटदाराच्या अंतिम देयकातून कंत्राटाच्या वाढीव कालावधीतील व्यवस्थापन सल्लागाराच्या वाढीव शुल्कापोटी रोखून ठेवलेली रक्कम रु.२३,१२,८२५/- कंत्राटदारास विनाव्याज परत द्यावी.

५.३ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :—

**<u>ठराव क्र.११२४</u> :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त

झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मौजे मानखुर्द येथे बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी सदनिका बांधण्याच्या कंत्राटांतर्गत कंत्राटदार मे.रिहॅब हाऊसिंग प्रा.लि. व लार्सन अँड टुब्रो लिमिटेड यांच्या अंतिम देयकातून कंत्राटाच्या वाढीव कालावधीतील व्यवस्थापन सल्लागारास द्यावयाच्या शुल्कापोटी रोखून ठेवलेली रक्कम रु.२३,१२,८२५/- कंत्राटदारास विनाव्याज परत करण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (लि.) यांना ठेव देण्याबाबत.**

**६.१** महानगर आयुक्त यांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी यांनी प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी ठेव स्वरुपात ठेवण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यांनी असेही सांगितले की, रु.१०० कोटी इतकी ठेव एका वर्षाच्या कालावधीकरीता काही अटी व शर्तीच्या अधिन राहून ठेवण्यात येईल.

**६.२** त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.११२५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या अधिनियमाच्या कलम ७ चे उप-कलम ३ चे पोटकलम (पाच) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, तसेच शासनाने निर्गमित केलेल्या गुंतवणूकीच्या मार्गदर्शक तत्वांच्या अधिन राहून, कार्यकारी समिती याद्वारे महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीस रु.१०० कोटी इतकी ठेव रक्कम एक वर्षाकरीता गुंतविण्यास बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाजेनको कंपनी सदरहू ठेव/व्याज वेळेवर परत करीत असल्यास, मुदत समाप्तीनंतर प्राधिकरणाच्या निधीच्या आवश्यतेनुसार व त्यावेळेच्या

बँकेच्या प्रचलित व्याजदरानुसार ठेवींच्या नुतनीकरणाचे अथवा रोखीकरणाचे अधिकार महानगर आयुक्त यांना राहतील.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : वडाळा भारवाहक तळ भाग-१ येथील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याचे कामासाठी प्रशासकीय मान्यता व निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

**७.१** महानगर आयुक्त यांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळाचा पहिला टप्पा हा पूर्ण करण्यात आलेला असून येथील अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रिटीकरण करण्याच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता व निविदेस मंजूरी मिळण्याबाबतचा हा प्रस्ताव आहे. या कामाकरीता मे.स्टुप लि. यांची संकल्प व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यांनी योग्य त्या चाचण्या घेऊन, पृष्ठभागाखालील भूस्तराचे सविस्तर अभ्यास व वाहतूकीचे सर्वेक्षण करुन (IRC च्या मानकाप्रमाणे) रस्त्याचा अंतिम आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखडा मे.आय.आय.टी., मुंबई यांच्याकडून प्रूफ चेकिंग करण्यात आला आहे. सदर कामाबाबतीत श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सूचविले की, 3rd Party तर्फे सदर कामाकरीता तांत्रिक परिक्षण (Technical Audit) करुन घ्यावे. तसेच कंत्राटदाराचे आर.एम.सी. प्लँटची पूर्व पात्रता तपासण्यात यावी. जेथे प्रत्यक्षात काम सुरु आहे त्या स्थळांवर गुणनियंत्रण परिक्षकाची नेमणूक करण्यात यावी. सदर प्रस्तावांतर्गत टप्पा-१ मध्ये एकूण १.२९२ कि.मी. व टप्पा-२ मध्ये एकूण १.६७३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या रुंदीच्या उपलब्धतेप्रमाणे (मंजूर आराखडयाप्रमाणे) काँक्रिटीकरण करावयाचे आहे. या कामाची मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. यांची निविदा टप्पा-१ चे कामाकरीता (-) १६.२९% कमी दराने व टप्पा-२ करीता (-) १७.१०% कमी दराने सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणारी सुसंवादी व रास्त असल्याने त्या निविदा मंजूर करण्यास कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली.

७.२ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.११२६ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वडाळा भारवाहक तळ भाग-१ येथील अंतर्गत रस्त्यांच्या टप्पा-१ व टप्पा-२ मधील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाच्या खालील तक्त्यात दर्शविलेल्या कामांसाठी रु.४१.८५ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे. तसेच या कामासाठी खालील तक्त्यात दर्शविलेल्या निविदाकारांच्या न्युनतम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (रु.) | लघुत्तम निविदाकाराचे नांव | लघुत्तम देकार | देकाराची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | वडाळा भारवाहक तळ येथील अंतर्गत रस्त्यांचे भाग-१ मधील टप्पा-१ चे कॉंक्रिटीकरण करणे. | १७,८२,००,०००/- (रु.१७.८२ कोटी) | मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. | (-) १६.२९% कमी दराने | १४,९१,७१,२२०/- |
| २. | वडाळा भारवाहक तळ येथील अंतर्गत रस्त्यांचे भाग-१ मधील टप्पा-२ चे कॉंक्रिटीकरण करणे. | २४,०३,००,०००/- (रु.२४.०३ कोटी) | मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. | (-) १७.१०% कमी दराने | १९,९२,०८,७००/- |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.८</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता वर्सोवा ते पश्चिम द्रुतगती महामार्ग या रस्त्याचे रुंदीकरण व सुधारीकरण. - मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.</u>**

८.१ महानगर आयुक्त यांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, सदर रस्त्यातून मेट्रो रेल्वेचा वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्ग प्रस्तावित असल्याने सदर रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केला नसून दैनंदिन देखभालीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे आहे. डॉ.जयराज फाटक, महापालिका आयुक्त यांनी हे काम साकीनाका येथेपर्यंत आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली असता हे काम वर्सोवा ते पश्चिम द्रुतगती महामार्ग या भागाचे असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले. या कामामध्ये काही अतिरिक्त बाबींचा अंतर्भाव करण्यात आला ज्यांचा मूळ कामांमध्ये समावेश नव्हता. या अनुषंगाने कामाच्या खर्चामध्ये वाढ झाली त्याची कारणमिमांसा त्यांनी प्रतिपादन केली.

८.२ श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सेवावाहिन्यांचे स्थलांतर करण्याचे काम हे त्या त्या एजन्सीने करावयाचे असते. त्यामुळे यासाठी वेगळा खर्च का करण्यात आला. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ज्या वेळेस सेवावाहिन्यांच्या दुरुस्तीची कामे असतात त्यावेळेस संबंधित एजन्सीमार्फत करण्यात येतात अशावेळी ती त्यांची जबाबदारी असते. सदरच्या कामात रस्ता रुंदीकरणासाठी सेवावाहिन्यांचे स्थलांतर करावे लागत असल्यामुळे सदर काम हे कंत्राटदारामार्फत करणे आवश्यक ठरते.

८.३ वरील सर्व बाबींचे अवलोकन करता अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता वर्सोवा ते पश्चिम द्रुतगती महामार्ग या रस्त्याचे रुंदीकरण व सुधारीकरण करण्याच्या कामावरील तक्ता क्र.१ मध्ये दर्शविलेल्या रु.२१.४८ कोटी इतक्या सुधारित रक्कमेस पूर्वी मंजूर केलेल्या निविदेंतर्गत मान्यता प्राप्त करण्याचे प्रस्तावित आहे. सदरील वाढीव काम व त्याच्या बाबी एकमेकास संलग्न असल्यामुळे सदरचे काम नेमलेल्या कंत्राटदारांकडून पूर्ण करुन घेण्यात आलेले आहे. कार्यकारी

..१३/-

समितीच्या २०७ व्या बैठकीत उपरोक्त कामाच्या मूळ खर्चास दिलेली मान्यता व सुधारीत खर्च यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नांव | स्विकृत निविदा रक्कम (रु.) | सुधारित खर्च (रु.) | वाढ (रु.) | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.आर.के.मधानी - प्राईम (जे.व्ही.) | १५,९८,३९,०२३/- | २१,४८,००,०००/- | ५,४९,६०,९७७/- | ३४.३८% |

म्हणजेच एकूण निविदा किंमत रुपये १५.९८ कोटीच्या सापेक्ष एकूण सुधारीत खर्च रु.२१.४८ कोटी इतका अपेक्षित आहे. त्यापैकी २२.३५% खर्च कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ झाल्यामुळे आहे व १२.०३ % इतका खर्च करारनाम्यातील भाव चढ उतार तरतुदीनुसार (Price Variation Clause) देय असलेल्या रकमेमुळे आहे.

८.४ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.११२७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता वर्सोवा ते पश्चिम द्रुतगती महामार्ग या रस्त्याचे रुंदीकरण व सुधारीकरणाच्या कामाच्या सुधारीत खर्चास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

| अनु.क्र. | कंत्राटदाराचे नांव | स्विकृत निविदा रक्कम (रु.) | सुधारीत खर्च (रु.) |
|---|---|---|---|
| १. | मे.आर.के.मधानी-प्राइम (जे.व्ही.) | १५,९८,३९,०२३/- | २१,४८,००,०००/- |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : मिठी नदी विकास कामांतर्गत टप्पा-२ च्या कामामधील खालील कामांच्या लघुत्तम निविदांना मान्यता मिळणेबाबत –**

(१) **मिठी नदीवरील सा.क्र.५४३१ मी. पासून (मिठी पूल) ते सा.क्र.५८८३मी. पर्यंत (सी.एस.टी.पूल) एल.बी.एस. मार्गाच्या बाजूला सविस्तर संकल्पन व भू-गर्भ संशोधन करुन आर.सी.सी. मरीन प्लॅटफॉर्मचे बांधकाम करणे. (अंदाजित किंमत रु.२०५८.०लाख)**

(२) **वाकोला नाल्यावरील वाल्मिकी नगरच्या बाजूला सा.क्र.१३४५ मी. पासून (नवीन भारतनगर पूल) ते सा.क्र.१६४५ मी. (नवीन वाकोला पूल) सविस्तर संकल्पन व भू-गर्भ संशोधन करुन आर.सी.सी. मरीन प्लॅटफॉर्मचे बांधकाम करणे. (अंदाजित किंमत रु.१९१२.० लाख)**

(३) **मिठी नदीवरील सा.क्र.०.०मी. पासून (माहिम कॉजवे) सा.क्र.२१४० मी. पर्यंत (समुद्रामध्ये) खोलीकरण व रुंदीकरण करणे. (अंदाजित किंमत रु.२५३३.०लाख)**

९.१ महानगर आयुक्त यांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, मिठी नदी विकास कामांतर्गत टप्पा-२ च्या कामांत वरील एकूण ३ कामे प्रस्तावित आहेत. तथापि, CRZ च्या प्रस्तावित नवीन धोरणानुसार CZMP च्या अंतर्गत set back line ही नदी किंवा नाल्याच्या काठापर्यंत करणे शक्य होईल. त्यामुळे क्र.२ च्या कामात वाकोला नाल्यावरील वाल्मिकी नगरच्या झोपडपट्टयांचे एस.आर.ए. (SRA) स्कीम अंतर्गत त्यांना आहे त्या ठिकाणीच पुनर्वसन करणे शक्य होईल. त्यामुळे प्रस्तावित मरीन प्लॅटफॉर्मचे काम आवश्यक राहणार नाही. तसेच मिठी नदीच्याबाबत उपलब्ध रुंदी पुरेशी असल्यामुळे व आवश्यक तेवढे रुंदीकरण संरक्षण भिंत (retaining wall) बांधून करण्यात येत असल्यामुळे या ठिकाणी सुध्दा मरीन प्लॅटफॉर्मची

आवश्यकता भासणार नाही. तसेच सी.एस.टी. पूलाचे जवळसुध्दा सुमारे ५५ मीटर एवढे रुंदीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे त्यापैकी पहिली २ कामे या प्राधिकरणाकडून करण्याचा प्रस्ताव मागे घेण्यात येत असून तिसरे काम घेण्याचे प्रस्तावित आहे.

९.२ या बदलामुळे सुमारे रु.५० ते ६० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यतेच्या रकमेची बचत होईल. परंतु क्र.३ च्या कामामध्ये मात्र समुद्रामध्ये खोलीकरण व रुंदीकरण करणे, CWPRS च्या शिफारशीनुसार करणे आवश्यक आहे.

९.३ श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सूचित केले की, कालमर्यादा अत्यंत कमी असून कामाचे काळजीपूर्वक नियोजन करणे आवश्यक आहे. तळाच्या प्राथमिक स्तराच्या नोंदी करुन प्राधिकरणाच्या अभियंत्यांनी कंत्राटदारासोबत संयुक्त तपासणी करुन सदर नोंदी अंतिम देयकापर्यंत सांभाळाव्यात.

९.४ त्यामुळे सदर कामाची क्र.३ ची निविदा कार्यकारी समितीची मंजूरी घेण्याच्या अधीन राहून स्विकारण्यात आली.

९.५ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.११२८</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मिठी नदी विकास कामांतर्गत टप्पा-२ मधील क्र.३ च्या प्रथम लघुत्तम निविदाकार मे.चिराग कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या निविदेस कार्योत्तर मान्यता देत आहे. मात्र त्यांनी अटींची पूर्तता न केल्यास द्वितीय लघुत्तम निविदाकारास काम देण्याचे अधिकार महानगर आयुक्त

..१६/-

यांना देत आहे व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

| अ.क्र. | कामाचे नांव | लघुत्तम निविदाकाराचे नांव | लघुत्तम निविदेची रक्कम / टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मिठी नदीवरील सा.क्र.०.०० मी. पासून (माहिम कॉजवे) सा.क्र.२१४०.० मी. पर्यंत (समुद्रामध्ये) खोलीकरण व रुंदीकरण करणे.<br>(शेरा : मे.चिराग कन्स्ट्रक्शन कंपनी यांची बोली क्षमता व देकाराबाबतची व्यवहार्यता स्विकार करणेचे अधिन राहून) | १) मे.चिराग कन्स्ट्रक्शन कंपनी | रु.१३,८१,७०,२४१/- (४५.४५% कमी दराने) |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी तसेच अ.क्र.३ च्या कामाबाबत पात्र ठरलेल्या निविदाकाराची निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने होणारा आर्थिक बदल मंजूर करण्याचे अधिकार व आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावरील आर.बी.कदम मार्ग, असल्फा, घाटकोपर (पश्चिम) येथील (via duct) चे बांधकाम.**

**१०.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या रस्त्यामध्ये अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्याचे रुंदीकरण व बांधकामाच्या (मिसिंग लिंकसहित) अंतर्भाव आहे. या पूलाच्या कामाच्या निविदा ३ वेळा बोलाविण्यात आल्या. पहिल्या दोन वेळच्या निविदा खूपच चढया दराच्या आल्यामुळे तिस-यांदा निविदा मागविण्यात आली. सदरहू रस्त्यावर अतिक्रमण निष्कासन कामास भरपूर विलंब झाल्याने कंत्राटदाराने नविन दर सूचीप्रमाणे दर देण्याची मागणी केली होती. तथापि, कंत्राटदाराचे विनंतीनुसार काम दिनांक २६ फेब्रुवारी, २००८ रोजी forceclose करण्यात आले. काम forceclose करेपर्यंत कामास रु.४.८९ कोटी खर्च झाला होता.

**१०.२** वरील सर्व बाबींचे अवलोकन करता मे.रोहित इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांच्या अंदाजित रक्कमेपेक्षा २०.७% जास्त असलेल्या दराच्या म्हणजे रु.१३,५८,१३,९५२/- च्या लघुत्तम निविदेस

मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या विचारार्थ व मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. तथापि, कार्यकारी समितीची बैठक ब-याच कालावधीमध्ये होऊ न शकल्यामुळे व सदर कामे करणे हे मेट्रोच्या कामासाठी आवश्यक असल्यामुळे कामास विलंब होत होता. त्यामुळे कामाची निकड लक्षात घेऊन कार्यकारी समितीच्या मंजूरीचे अधिन राहून काम सुरु करण्याचे आदेश देण्यात आले.

**१०.३** त्यामुळे महानगर आयुक्त यांनी अशी विनंती केली की, सदरहू बाब टिप्पणीस कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.

**१०.४** तथापि, श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी मागील बैठकीतील चर्चेमधील मुद्दे उपस्थित केले. त्यानुसार निविदा जादा येण्याची जी कारणे देण्यात आली आहेत ती सल्लागारांनी अंदाजपत्रक (estimate) तयार करुनच मंजूरी घेणे आवश्यक होते. त्यामुळे सल्लागारांना यापुढील कामामध्येसुध्दा याबाबत सूचना देण्यात याव्यात अशी त्यांनी सूचना केली.

**१०.५** त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.११२९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावरील आर.बी.कदम मार्ग, असल्फा, घाटकोपर (पश्चिम) येथील कामासाठी प्राप्त झालेली मे.रोहित इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.७% जास्त दराची म्हणजे रु.१३,५८,१३,९५२/- (रु.तेरा कोटी अठ्ठावन्न लाख तेरा हजार नऊशे बावन्न फक्त) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**बाब क्र.११ : वांद्रे-कुर्ला संकुलामधील मोनोरेल प्रकल्प - तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी दिल्ली इंटिग्रेटेड मल्टीमॉडेल ट्रान्झिट सिस्टीम लिमिटेड (डी.आय.एम.टी.एस.) यांची नेमणूक करणेबाबत – कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

**११.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलामधील मोनोरेल प्रकल्पासाठी तांत्रिक व वित्तीय अभ्यास करण्यासाठीचा हा प्रस्ताव आहे. तसेच सदर अभ्यास हा दिल्ली इंटिग्रेटेड मल्टीमॉडेल ट्रान्झिट सिस्टीम लिमिटेड (I.D.F.C आणि Govt. Of Delhi अंगीकृत) मार्फत पूर्ण करणार आहे. यापूर्वी दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशन (डी.एम.आर.सी.) व राईट्समार्फत झालेल्या सुसाध्यता अभ्यासाचा विचार करता इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपेंट फायनान्स कंपनी प्रोजेक्ट्स लिमिटेड यांनी सादर केलेला प्रस्ताव रास्त असल्याचे महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावास दिलेल्या मान्यतेस कार्यकारी समितीने कार्योत्तर मान्यता द्यावी.

**११.२** श्री.द.म.सुकथनकर यांनी असे सुचविले की, DRA आणि SRA यांनी नुकताच धारावी रिडेव्हलमेंट संदर्भात एक अभ्यास पूर्ण केला आहे. त्या अभ्यासाच्या शिफारशींचा विचार करुन त्यांचा सदर अभ्यासामध्ये एकत्रित करण्याबाबत विचार करावा. सदर सूचनेबाबत महानगर आयुक्त यांनी याबाबत सल्लागारांना सूचित करण्याबाबत सहमती दर्शविली आहे.

**११.३** त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.११३० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे, वांद्रे-कुर्ला संकुलामधील मोनोरेल प्रकल्पासाठी तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी ज्यामध्ये किमान आवश्यक वाहतूक सर्वेक्षण, प्रकल्पाच्या क्षेत्राकरीता परिवहन नियोजन, ट्रॅफिक डिमांड असेसमेंट इत्यादी तयार करणे तसेच प्रकल्प राबविण्यासाठी कार्य आराखडा (बिझनेस प्लॅन) तयार करणे समाविष्ट राहिल. याबाबत इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी लिमिटेड यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार दिल्ली इंटिग्रेटेड मल्टिमॉडेल ट्रान्झिट सिस्टीम लिमिटेड (डि.आय.एम.टी.सी.) यांची रु.७०,००,०००/- (रुपये सत्तर लाख) अधिक सेवा कर एवढया शुल्क रकमेवर नेमणूक करण्यास व हा सुसाध्यता अभ्यास सदर कामाचे आदेश दिल्यानंतर ४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१२</u> : <u>दिनांक ३०.०९.२००८ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २००८ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१३</u> : <u>दिनांक ३१.१२.२००८ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

..२०/-

**बाब क्र.१४ : मुंबई महानगर प्रदेशात मोनोरेल व्यवस्था : प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची पुनर्नियुक्ती - मे.सोईल लिमिटेड (Sowil Ltd) + क्रिग कंपनी लि., चायना (China Railway Eryuan Engineering Group Co. Ltd.,China) + टिम वन आर्किटेक्टस् इंडिया प्रा.लिमिटेड (Team One Architects India Pvt. Ltd.) यांच्याऐवजी लुईस बर्जर ग्रुप (Louis Berger Group) + ए.ई.आय.बी. (Architectural & Engineering Innovations Bureau) यांची नियुक्ती करणेबाबत.**

१४.१ कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या २२५व्या बैठकीमध्ये मोनोरेल प्रकल्पाच्या संत गाडगे महाराज चौक (जेकब सर्कल) - वडाळा भारवाहक तळ मार्ग - चेंबूर रेल्वे स्टेशन या छन्नमार्गासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता दिली आहे.

१४.२ प्राधिकरणाचे मोनोरेल सदस्य आणि सल्लागारांच्या तज्ञ व्यक्ती यांच्यासोबत झालेल्या अनेक बैठकींमध्ये असे निदर्शनास आले की, व्यवसाय संचालक (Business Director) श्री.Xu zeng xin व्यतिरिक्त उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी कोणालाही इंग्रजी भाषेचे ज्ञान नाही. (लिहिणे, बोलणे, वाचणे यापैकी कोणतेही ज्ञान नाही). श्री.Xu zeng xin हे व्यवसाय संचालक असून निविदा सादर करताना दाखविलेल्या टिमचा सध्याच्या टिममध्ये अंतर्भाव नाही. त्यामुळे ब-याचवेळा मिटींगमध्ये प्राधिकरणाच्या सदस्यांचे अभिप्राय तसेच तांत्रिक मुद्यांवर सल्लागार काय बोलतात यामध्ये समन्वय राहत नाही आणि संवादही साधता येत नाही.

१४.३ वरील सर्व कारणे लक्षात घेता दिनांक ४ मार्च, २००९ रोजी मे.सोईल लिमिटेड या कंपनीस विनंती प्रस्तावातील (RFP) परिच्छेद १.८ च्या भाग २ अन्वये "misrepresentation of facts" या अटीअंतर्गत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. महानगर आयुक्त यांनी सल्लागारांना त्यांची बाजू मांडण्याची पूरेशी संधी दिली आणि प्रकल्प अंमलबजावणीची कार्यप्रणाली लक्षात घेता, या प्रकल्पास कोणत्याही प्रकारे विलंब टाळण्याकरीता विनंती प्रस्तावामध्ये दिलेल्या

..२१/-

अटी व शर्तीनुसार सल्लागारांच्या सोबत झालेला करारनामा दिनांक २२ एप्रिल, २००९ रोजी repudiate करण्यात आला.

१४.४ मे.लुईस बर्जर ग्रुप या कंपनीचा यापूर्वी कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या सल्लागारांच्या अंतिम यादीत समावेश आहे आणि या कंपनीचा देकार हा मे.सोईल लिमिटेड (Sowil Ltd) + क्रिग कंपनी लि.,चायना (China Railway Eryuan Engineering Group Co. Ltd. China) + टिम वन आर्किटेक्टस् इंडिया प्रा. लिमिटेड यांच्यापेक्षा रु.४०,८६,९०० इतका कमी आहे. त्याचप्रमाणे मे.लुईस बर्जर ग्रुप यांच्या कामामध्ये प्रुफ चेकिंगचा सुध्दा समावेश करण्यात आला असून त्याद्वारे प्राधिकरणाला अतिरिक्त रु.७ कोटी वाचविणे शक्य होणार आहे. त्यामुळे कार्यकारी समितीस अशी विनंती करण्यात येत आहे की, मे. लुईस बर्जर ग्रुप या कंपनीस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व प्रुफ चेकींग सल्लागार म्हणून रु.३५,११,५०,०००/- + सेवा कर एवढया फी वर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

१४.५ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.११३१</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.लुईस बर्जर ग्रुप (Louis Berger Group) + ए.ई.आय.बी. (Architectural & Engineering Innovations Bureau) या कंपनीस प्रकल्प व्यवस्थापन प्रुफ चेकिंग सल्लागार म्हणून रु.३५,११,५०,०००/- + सेवा कर एवढया फी वर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समितीचे कार्यवृत्त मंजूर होण्याची प्रतिक्षा न बघता मे.लुईस बर्जर ग्रुप कंपनीस काम करण्याचे कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत

..२२/-

आहे. तसेच वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. ”

**बाब क्र.१५ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - सर्वंकष परिवहन अभ्यास - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नेमलेले सल्लागार मे.ली इंटरनॅशनल कॅनडा आणि ली असोसिएटस् प्रा.लि. यांनी मागणी केलेल्या अतिरिक्त देयक प्रदान करणेबाबत.**

**१५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की मे. LEA Associates International, Canada यांच्यामार्फत जागतिक बँकेच्या सहाय्याने मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत (MUTP) मुंबई महानगर प्रदेशासाठी हाती घेतलेला सर्वंकष परिवहन अभ्यास हा अंत्यत महत्वाचा आहे. अशा प्रकारचा अभ्यास इतक्या मोठया प्रमाणावर आतापर्यंत जगात ब-याच कमी ठिकाणी झाला आहे. जागतिक बँकेच्या मान्यतेने सल्लागारांची दिनांक ५ जानेवारी, २००५ रोजी नेमणूक करण्यात आली होती. तसेच या अभ्यासाचा कालावधी हा १८ महिने इतका ठरविण्यात आला होता. परंतु तांत्रिक सल्लागार समितीने तसेच जागतिक बँकेशी वेळोवेळी केलेल्या चर्चेनुसार कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ झाल्यामुळे १८ महिन्यात पूर्ण होणा-या कामास सुमारे ३६ महिने लागलेले आहेत. प्राधिकरण आणि जागतिक बँकेच्या सल्ल्यानुसार मुंबई, नवी मुंबई, ठाणे, वसई, विरार, मीर-भाईंदर, नालासोपारा, कल्याण, डोंबिवली या ठिकाणी मोठया प्रमाणावर सल्लामसलत बैठका घेऊन सल्लागाराने सदर अभ्यासाचे सादरीकरण केले. सहयाद्री अतिथीगृहामध्ये मुंबई महानगर प्रदेशातील सर्व संबंधित खासदार, आमदार तसेच इतर लोकप्रतिनिधींना सदर अभ्यासांचे सादरीकण केले. सदर अभ्यासास प्राधिकरणाने मान्यता दिली असून जून, २००८ मध्ये सदर अभ्यास शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे.

**१५.२** तरी कार्यकारी समितीस विनंती करण्यात येते की, जागतिक बँकेने मान्यता दिल्यानुसार मे.LEA Associates International, Canada आणि LEA Associates South Asia Pvt. Ltd., India यांनी मागणी केलेल्या अतिरिक्त देयकांपैकी CAN $ ३३९१२३/- + रु.१,६६,३१,४१५ सर्व करासहित देण्यास मान्यता द्यावी.

..२३/-

**१५.३** त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मंजूर करुन पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.११३२ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.LEA Associates International, Canada आणि LEA Associates South Asia Pvt. Ltd. India यांनी मागणी केलेल्या अतिरिक्त देयकांपैकी CAN $ ३३९१२३/- + रु.१,६६,३१,४१५/- सर्व करासहित देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर खर्च मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - तांत्रिक सहाय्यता (MUTP-TA) मधून ग्राहय धरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (एमयुआयपी) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून अंमलबजावणी होत असलेल्या १) सुमन नगर, २) टाईम्स ऑफ इंडिया, ३) ठाकूर कॉम्प्लेक्स व ४) बर्फीवाला गल्ली येथील उड्डाणपुलांच्या उर्वरीत कामाच्या बाबींचे दर २००७-०८ च्या दरसूची सुधारीत करण्याबाबत.**

**१६.१** महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाची माहिती दिली त्या अनुषंगाने झालेल्या चर्चेत श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी पुढील मुद्दे उपस्थित करुन काही सूचना केल्या :-

(अ) समितीचा अहवाल

(१) सर्व समिती सदस्यांनी अहवालावर स्वाक्षरी केली नाही तरी ती करण्यात यावी.

(२) समितीच्या अहवालातील परिच्छेद क्र.३.६ मधील तत्व हे कायदेशीर तत्वाच्या विसंगत आहे. करारनाम्यातील कलमात जर अर्थसंभ्रम होत असेल तर समितीच्या अहवालातील परिच्छेद क्र.३.६ मधील तत्व योग्य आहे अन्यथा करारनाम्यातील कलमाचा उपयोग होणार नाही, यास्तव कायदेशीर सल्ला घेण्यात यावा.

(३) समितीच्या अहवालात नाण्याच्या एका बाजूचा विचार केलेला दिसतो. जर सेवावाहिन्यांचे स्थलांतर शक्य नसल्यास पूलाच्या रचनेतील बदल कंत्राटदाराने जास्तीच्या खर्चाची मागणी न करता करणे व भाववाढीचे कलम ७०.१ ही कंत्राटातील कलमे नमूद केलेली दिसून येत नाही. कंत्राटदाराची कार्यक्षमता व कामातील अडचणी दूर करण्याचे कंत्राटदार / संनियंत्रक / महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी केलेले प्रयत्न तपासले गेलेले दिसत नाही.

(४) याबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी कायदेशीर सल्लागारांकडून त्यांचे मत घेण्यात यावे.

(५) असे दिसून येते की, समितीच्या शिफारशीनंतर मूळ प्रस्तावापेक्षा सुमारे रु.१ कोटीची जास्त रक्कम कंत्राटदाराला देण्याचे प्रस्तावित आहे. यावर श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी सांगितले की, Star Rate निर्देशित केल्यानुसार ही रक्कम ब-याच अंशी कमी होऊ शकेल. कारण पुढच्या कालावधीमध्ये सिमेंट व स्टीलचे दर ब-याच अंशी कमी झालेले आहेत.

(६) याशिवाय MSRDC व सल्लागार यांनी सदर कामातील अडथळे दूर करण्यासाठी कोणते प्रयत्न केले हे सुध्दा नमूद करणे आवश्यक आहे.

(७) नवीन प्रस्तावानुसार सध्याच्या ठरावातील करारनामा (agreement) रद्दबादल होत आहे व नवीन करारनामा करण्यास भाग पडत आहे का ? याबाबतही विचार होणे आवश्यक आहे.

(८) याशिवाय कंत्राटदारांनी कामे पूर्ण क्षमतेने (efficiently) केलेली आहे किंवा कसे ? हे सुध्दा पडताळणे आवश्यक आहे.

**१६.२** श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी यास्तव सदर प्रस्तावास सहमती दर्शविली नाही. तसेच त्यांनी पूढे सूचित केले की, सदर प्रस्तावात लोखंड, सिमेंट व डांबर या साहित्याचे सुधारीत दर करण्याचे प्रमुख कारण दिलेले आहे. जर कार्यकारी समितीला सदर भरमसाठ वाढीसाठी काही ठराविक अवधीसाठी विशेष बाब म्हणून विशेष सहाय्य द्यायचे असेल तर ते अशाप्रकारच्या डांबराच्या वाढीसाठी काही वर्षापूर्वी शासनाने ज्या तत्वावर दिले होते त्या तत्वाप्रमाणे देणे योग्य वाटते.

..२५/-

१६.३ सध्या कंत्राटदारांनी काम खूप धिम्या गतीने सुरु ठेवले आहे व कंत्राटदाराने अशा गतीने काम केल्यास पूलाची कामे लांबतील व जनतेची खूप गैरसोय होईल. यास्तव महानगर आयुक्त यांनी मुख्य सचिव यांना याबाबत निर्णय लवकर घेण्याचे सूचित केले. सदर बाबीबाबत पुढील बैठकीत निर्णय घेण्याचे सूचित केले.

१६.४ त्यावर सर्वानुमते असे ठरले की, श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा अभ्यास करुन पुढील बैठकीत हा विषय पुन्हा मांडण्यात यावा.

**बाब क्र.१७ : मुंबई महानगर प्रदेशात मोनोरेल व्यवस्था : संत गाडगे महाराज चौक-वडाळा-चेंबूर या मार्गाबर मे.लार्सन अँड टुब्रो आणि स्कोमी इंजिनिअरींग बीएचडी या समूहामार्फत राबविण्यात येणा-या मोनोरेलच्या कार्य व देखभाल खर्चास मंजूरी देणेबाबत.**

**कार्यकारी समितीच्या २२५ व्या बैठकीतील ठराव क्र.१११० मध्ये अंशतः सुधारणेस मंजूरी देणेबाबत.**

१७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे.लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बीएचडी (Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.) या समुहामार्फत संत गाडगे महाराज चौक - वडाळा-चेंबूर या मार्गावरील मोनोरेलच्या कामासाठी कार्यकारी समितीने २२५व्या बैठकीत ठराव क्र.१११० अन्वये मंजूरी दिली होती. त्यावेळी बाब टिप्पणीत तीन वर्षाचे कार्य व देखभाल खर्चाचा उल्लेख होता. परंतु ठरावामध्ये मंजूरीचा उल्लेख झालेला नाही. त्यामुळे २२५ व्या बैठकीच्या ठराव क्र.१११० अन्वये केलेल्या ठरावामध्ये अंशतः बदल करुन मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठी रु.२४६० कोटी (कर वगळता) + तीन वर्षाचा कार्य व देखभाल दुरुस्तीचा खर्च रु.१७९,२०,७७,०००/- (अनुक्रमे प्रथम वर्ष रु.४८,४४,२८,०००/-, द्वितीय वर्ष रु.५९,१५,८४,७००/- आणि तृतीय वर्ष रु.७१,६०,६४,३००/-) धरुन एकूण निविदा रक्कम रु.२६३९,२०,७७,०००/- (कर वगळता) यास मान्यता देण्यात यावी. तसेच कार्यवृत्त सुधारीत करण्याचा प्रस्ताव आहे. सदर प्रस्ताव मंजूर करण्यात यावा अशी विनंती कार्यकारी समितीस करण्यात येत आहे.

..२६/-

१७.२ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११३३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरींग, बीएचडी (Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.) या समुहामार्फत संत गाडगे महाराज चौक - वडाळा-चेंबूर या मार्गावरील मोनोरेलच्या कामासाठी कार्यकारी समितीच्या २२५व्या बैठकीत ठराव क्र.१११० अन्वये मंजूर केलेल्या ठरावामध्ये अंशतः बदल करुन मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठी रु.२४६० कोटी (कर वगळता) + तीन वर्षाचा कार्य व देखभाल दुरुस्तीचा खर्च रु.१७९,२०,७७,०००/- (अनुक्रमे प्रथम वर्ष रु.४८,४४,२८,०००/-, द्वितीय वर्ष रु.५९,१५,८४,७००/- आणि तृतीय वर्ष रु.७१,६०,६४,३००/-) धरुन एकूण निविदा रक्कम रु.२६३९,२०,७७,०००/- (कर वगळता) यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेला एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-३ प्रकल्पासाठी कर्जसहाय्य.**

१८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रस्ताव हा मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेला एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-३ प्रकल्पासाठी कर्जसहाय्य देण्याचा आहे.

त्यांनी कर्जसहाय्यासाठी प्राधिकरणाला विनंती केलेली आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी आणि कर्ज घेण्यासाठी महानगरपालिकेने प्रशासकीय मान्यता दिली असून शहर अभियंत्यांनी तांत्रिक मंजुरीही दिली आहे. तसेच भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने प्राधिकरणाकडून कर्ज उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे परवानगी मागितली आहे. महानगरपालिकेची वित्तीय क्षमता तपासण्यात आलेली असून त्यांना अप्रेझल अहवालाच्या परिच्छेद क्र.१८ ते २५ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून कामे देण्यात येईल. कर्जाच्या अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेला कर्ज वितरित करण्यात येईल. महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीला अशी विनंती केली आहे की, महानगरपालिकेच्या एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-३ प्रकल्पासाठी भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने केलेली कर्जाची विनंती मान्य करुन मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत रु.२१२० लाख इतकी द.सा.द.शे. ८% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी महानगरपालिकेच्या या प्रस्तावित प्रकल्पासाठी कर्जरुपाने आर्थिक सहाय्य करण्यास मान्यता द्यावी. असे कर्जसहाय्य देताना यापुढे कामांची अंमलबजावणी सुयोग्यतेने संघटीत करणे, दर्जा नियंत्रण आणि कामे पूर्ण झाल्यावर सुस्थितीत ठेवण्यासाठी व्यवस्था करणे यासंबंधीच्या अटी घालाव्यात अशी सूचना श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी केली.

१८.२ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.११३४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१अ अन्वये प्राधिकरणाने ठराव क्र.४२२, दिनांक ३१ मार्च, १९९० द्वारे कार्यकारी समितीस हक्क प्रदान केले असून त्याद्वारे कार्यकारी समिती भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेला एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-३ प्रकल्पासाठी अंमलबजावणी रु.२१२० लाख इतकी कर्जाऊ रक्कम मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

..२८/-

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करुन कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्जसहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तींमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१९ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेला पाणीपुरवठा वितरण व्यवस्था या प्रकल्पासाठी कर्जसहाय्य देणे.**

**१९.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उल्हासनगर महानगरपालिकेने केंद्र शासनाकडे जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत सादर केलेल्या प्रकल्पांपैकी पाणीपुरवठा वितरण व्यवस्था हा प्रकल्प मंजूर झाला असून रस्ते सुधारणा आणि भुयारी मलनिःस्सारण प्रकल्प हे केंद्र शासनाच्या विचाराधीन आहेत. रस्ते व भुयारी मलनिःस्सारण प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मंजुरी मिळण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे महानगरपालिकेने केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या पाणीपुरवठा वितरण व्यवस्था हया प्रकल्पासाठी रु.६३.८३ कोटी (खर्चातील पालिकेच्या ५०% हिश्यापोटी) इतक्या कर्जाची मागणी केली आहे. सदर कामाकरीता महापालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्र.३४, दिनांक १३.७.२००७ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तसेच मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मंजूरी दिली आहे. कर्ज परतफेडीची महानगरपालिकेची वित्तीय क्षमता तपासून आलेली असून त्यांना अप्रेझल अहवालाच्या परिच्छेद क्र.७ ते १२ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून कर्ज देण्यात येईल. महानगर आयुक्तांनी कार्यकारी समितीस अशी विनंती केली की, उल्हासनगर महानगरपालिका पाणीपुरवठा वितरण व्यवस्था या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत रु.६३.८३ कोटी इतकी कर्ज रक्कम द.सा.द.शे ८% व्याज दर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता द्यावी. असे कर्जसहाय्य देताना यापुढे कामांची अंमलबजावणी सुयोग्यतेने संघटीत करणे, दर्जा नियंत्रण आणि कामे पूर्ण झाल्यावर सुस्थितीत

ठेवण्यासाठी व्यवस्था करणे यासंबंधीच्या अटी घालाव्यात अशी सूचना श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी केली.

१९.२ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.११३५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१अ अन्वये प्राधिकरणाने ठराव क्र.४२२, दिनांक ३१ मार्च, १९९० द्वारे कार्यकारी समितीस प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मंजूर खर्चाचा ५०% म्हणजे ६३.८३ कोटी इतकी कर्जाऊ रक्कम उल्हासनगर महानगरपालिकेस मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करणे तसेच कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्जसहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तींमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२० : मुंबई महानगर प्रदेशांतर्गत विविध रेल्वे स्थानकांच्या परिसरात १० ठिकाणच्या आकाशमार्गिकेच्या (स्कायवॉक) बांधकामांच्या विविध निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

२०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर स्कायवॉकच्या एकूण १० ठिकाणावरील कामाची ३५ पॅकेजमध्ये विभागणी केलेली आहे. त्यांनी कार्यकारी समितीस अशीही विनंती केली की, बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.८ मधील विवेचनानुसार

..३०/-

१० ठिकाणच्या विविध स्कायवॉकच्या बांधकामासाठी शिफारस केलेले सर्व लघुत्तम निविदाकारांचे कमी केलेले अंतिम सुधारीत देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे तसेच सुसंवादी व रास्त असल्यामुळे आणि सदर निविदांच्या कामाची रक्कम महानगर आयुक्त यांच्या प्राधिकृत अधिकारांतर्गत येत असल्यामुळे सदर देकार महानगर आयुक्त यांच्या स्तरावर स्विकृत करणेबाबत कार्यकारी समितीच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे.

२०.२ चर्चेच्या अनुषंगाने महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, स्कायवॉकच्या सर्व चालू कामामध्ये केवळ मुलुंड येथील कामच फक्त बंद करण्याची वेळ आली कारण स्थानिक दुकानदारांनी याबाबत निवेदन सादर केले. इतर सर्व कामे व्यवस्थित चालू असून महानगरपालिकेबरोबर योग्य समन्वय साधण्यात आला आहे. श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, जनतेच्या सोयीसाठी प्रत्येक स्कायवॉकच्या विशिष्ट जागांजवळ वाहतूकीचा नकाशा तसेच लोकांची गैरसोय कमी कशी होईल याबाबत एक टिप्पणी काढण्यात यावी व संबंधितांशी विचार करुन final करावी. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर सखोल अभ्यास करुन, बांधकामाच्यावेळी पादचारी व वाहनधारकांना अडचणी उद्भवणार नाहीत याची व्यवस्था व खबरदारी घ्यावी असेही श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सूचित केले. मुलुंड येथील स्कायवॉकबाबत सर्व संबंधितांशी विचार करुन महानगर आयुक्त यांनी महापालिका आयुक्त यांना अशी विनंती केली की, L.T. Road च्या मध्ये लावण्यात आलेली झाडे फुटपाथवर हलविण्यात यावीत. जेणेकरुन जास्त रस्ता वाहतूकीसाठी उपलब्ध होईल. तसेच स्कायवॉकचे काम व्यवस्थित होईल.

२०.२ त्यानंतर, श्री.एन्.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सर्वसाधारणपणे असे सूचित केले की, कंत्राटदाराच्या कामाचेसुध्दा Audit होणे आवश्यक आहे. असे Audit साधारण दर ३ महिन्यांनी घेण्यात यावे. गुण नियंत्रणासाठी (Quality Control) सल्लागाराव्यतिरिक्त इतर तज्ञांची नेमणूक करणे योग्य होईल. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, स्कायवॉकच्या कामामध्ये Indian Register of Shipping यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. याशिवाय ready mix concrete च्या quality audit साठी ICMQ या ईटालियन तज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

..३१/-

२०.३ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.११३६ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे खालील निविदाकारांच्या लघुत्तम निविदा प्राधिकरणाच्या निविदा समितीने शिफारस केल्यानंतर महानगर आयुक्तांच्या स्तरावर, करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह स्विकृत करण्यास मान्यता देत आहे :-

| अ. क्र. | स्कायवॉकच्या कामाच्या स्टेशनांची नांवे | निविदाकाराचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (रु. कोटीत) | वाटाघाटानंतर देकाराची सुधारीत टक्केवारी | देकाराची रक्कम (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| १. | घाटकोपर (पू.) भाग-१ | मे.दास ऑफशोअर इंजिनियरिंग प्रा.लि. | ७.१७ | ९.१०% | ७.८२ |
| २. | घाटकोपर (पू.) भाग-२ | मे.दास ऑफशोअर इंजिनियरिंग प्रा.लि. | ६.०० | ९.९९% | ६.६० |
| ३. | घाटकोपर (पू.) भाग-३ | मे.आर.के.मदानी आणि कं. | ७.१७ | ९.९९% | ७.८९ |
| ४. | माहिम (पू.) भाग-१ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.३७ | ८.०१% | ६.८९ |
| ५. | माहिम (पू.) भाग-२ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.१७ | ८.०१% | ६.६७ |
| ६. | माहिम (पू.) भाग-३ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.१७ | ८.०१% | ७.८९ |
| ७. | माहिम (प.) भाग-१ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.३७ | १.००% | ६.४३ |
| ८. | माहिम (प.) भाग-२ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.३७ | १.००% | ६.४३ |
| ९. | माहिम (प.) भाग-३ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.३७ | १.००% | ६.४३ |
| १०. | माहिम (प.) भाग-४ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.७९ | १.००% | ६.८६ |
| ११. | माहिम (प.) भाग-५ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.७९ | १.००% | ६.८६ |
| १२. | माहिम (पू.) भाग-६ | मे.लिओडक्ट इंजिनियर्स अँड कन्सल्टंट्स लि. | ६.७९ | ११.७५% | ७.५९ |
| १३. | अंबरनाथ (पू.) | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.५८ | अंदाजपत्रकीय दराने | ६.५८ |
| १४. | अंबरनाथ (प.) | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ६.३२ | अंदाजपत्रकीय दराने | ६.३२ |
| १५. | विक्रोळी (पू.) भाग-१ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ५.८२ | ३.६०% | ६.०३ |

| अ. क्र. | स्कायवॉकच्या कामाच्या स्टेशनांची नांवे | निविदाकाराचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (रु. कोटीत) | वाटाघाटानंतर देकाराची सुधारीत टक्केवारी | देकाराची रक्कम (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| १६. | विक्रोळी (पू.) भाग-२ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ७.२६ | ३.६०% | ७.५२ |
| १७. | विक्रोळी (पू.) भाग-३ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ५.५६ | ३.६०% | ५.७६ |
| १८. | विक्रोळी (प.) | मे.दास ऑफशोअर इंजिनियरींग प्रा.लि. | ७.९७ | ९.१०% | ८.७० |
| १९. | महालक्ष्मी भाग-१ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ५.७२ | १०.००% | ६.२९ |
| २०. | महालक्ष्मी भाग-२ | मे.लिओडक्ट इंजिनियर्स अँड कन्सल्टंट्स लि. | ५.६५ | ३.१५% | ५.८३ |
| २१. | महालक्ष्मी भाग-३ | मे.आर.इ.इन्फ्रा प्रा.लि. | ६.२९ | २.६०% कमी | ६.१३ |
| २२. | महालक्ष्मी भाग-४ | मे.लिओडक्ट इंजिनियर्स अँड कन्सल्टंट्स लि. | ६.२९ | अंदाजपत्रकीय दराने | ६.२९ |
| २३. | महालक्ष्मी भाग-५ | मे.आर.इ.इन्फ्रा प्रा.लि. | ६.२५ | २.८५% | ६.४३ |
| २४. | महालक्ष्मी भाग-६ | मे.पी.बी.ए.कंन्स्ट्रक्शन्स | ५.६५ | १०.००% | ६.२२ |
| २५. | महालक्ष्मी भाग-७ | मे.लिओडक्ट इंजिनियर्स अँड कन्सल्टंट्स लि. | ६.२५ | अंदाजपत्रकीय दराने | ६.२५ |
| २६. | खडापारसी भाग-१ | मे.एस.व्ही.जिव्हानी | ५.२३ | १०.००% | ५.७५ |
| २७. | खडापारसी भाग-२ | मे.लिओडक्ट इंजिनियर्स अँड कन्सल्टंट्स लि. | ४.५३ | ६.९०% | ४.८४ |
| २८. | खडापारसी भाग-३ | मे.लिओडक्ट इंजिनियर्स अँड कन्सल्टंट्स लि. | ६.७४ | ७.९०% | ७.२७ |
| २९. | खडापारसी भाग-४ | मे.वालेचा इंजिनियरींग प्रा.लि. | ६.९४ | ९.५४% | ७.६० |
| ३०. | सायन भाग-१ | मे.दास ऑफशोअर इंजिनियरिंग प्रा.लि. | ६.७७ | १.८०% | ६.८९ |
| ३१. | सायन भाग-२ | मे.दास ऑफशोअर इंजिनयरिंग प्रा.लि. | ६.५३ | १.८०% | ६.६५ |
| ३२. | सायन भाग-३ | मे.दास ऑफशोअर इंजिनियरिंग प्रा.लि. | ७.२७ | १.८०% | ७.४० |
| ३३. | सायन भाग-४ | मे.दास ऑफशोअर इंजिनियरिंग प्रा.लि. | ६.४० | १.८०% | ६.५२ |
| ३४. | सायन भाग-५ | मे.दास ऑफशोअर इंजिनियरिंग प्रा.लि. | ७.३७ | १.८०% | ७.५० |
| ३५. | सायन भाग-६ | मे.दास ऑफशोअर इंजिनियरिंग प्रा.लि. | ४.६९ | १.८०% | ४.७७ |

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील कामाच्या बांधकामासाठी नेमण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या शुल्कांची देयके अदा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२१ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ डिसेंबर, २००८ ते दिनांक ३० एप्रिल, २००९.**

दिनांक १ डिसेंबर, २००८ ते दिनांक ३० एप्रिल, २००९ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

******************